# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११०१८

## पशुवैदयकीय विभाग

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकाच्या पशुवैदयकीय विभागामध्ये ``सर्पमित्र तथा प्राणीमित्र`` एकत्रित मानधनावर भरणे बाबत.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पशुवैदयकीय विभागासाठी सर्पमित्र तथा प्राणीमित्र अभिनामाचे पद ६ महीने कालावधीकरता एकत्रित मानधनावर नेमावयाचे आहे. तरी सदर पदासाठी अर्हता व अटी शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र | .पद संख्या | अर्हता / अनुभव | एकत्रित मानधन | कामकाजाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|
| १ | ८ | विषयाधिन कामामध्ये तज्ञ व अनुभवी असणे अत्यावश्यक. | कामगार कल्याण विभागाकडील किमान वेतनदरानूसार मानधन | पिंपरी चिंचवड महानगरपालिका हददीमध्ये शहरी भागात आढळणारे सर्प, अपघातग्रस्त वन्यप्राणी इत्यादी महाराष्ट्र शासनाच्या वनविभागाच्या नियमानुसार त्यांना सुरक्षित पध्दतीने पकडून ताब्यात घेणे .वनविभागाच्या मार्गदर्शनाखाली त्यांना परत निसर्गात सोडणे.तसेच या संदर्भातील शहरातील तक्रारींचे निराकरण करणे. |

**अटी व शर्ती :**

(१) मानधनावरील नेमणुका पुर्णपणे तात्पुरत्या (हंगामी) स्वरुपाच्या आहेत. त्यामुळे अर्जदारास महापालिका आस्थापनेवार कोणत्याही कायम पदी नेमणुकीचा हक्क राहणार नाही.

(२) म.न.पा.च्या इतर कर्मचा-यांना लागु असणा-या इतर सुविधा, हक्क व आर्थिक लाभ मिळणार नाही.

(३) अर्जासोबत वर्तमान कालावधीत काढलेले स्वत:चे दोन रंगीत फोटो जोडावे. तसेच लिफाफयावर संबंधित पदासाठी अर्ज नमुद करावा.

(४) अर्जासोबत विषयांकित कामकाजाचे अनुभवाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(५) स्थानिक रहीवासी उमेदवारास प्राधान्य देणेत येईल.

(६) कामाची वेळ कार्यालयीन वेळेप्रमाणे राहिल. तथापि तातडीक व अपवादात्मक प्रसंगी विभागाचे सोईनुसार तसेच तक्रारींचे निराकरण करणेकामी २४ तास सुसज्ज असणे आवश्यक आहे.

(७) मानधनावरील नियुक्त सहा महीने कालावधीची आहे.

(८) मानधनावरील सर्पमित्र तथा प्राणीमित्र प्राणी संग्रहालय काम सोडताना किमान एक महिना अगोदर लेखी पुर्वसूचना कार्यालयास देणे बंधनकारक राहील.

(९) मानधनावरील सर्पमित्र तथा प्राणीमित्र प्राणी संग्रहालय पद म्हणजे शासकीय नोकरी नाही. त्यामुळे वेतन श्रेणीत नियुक्ती मिळावी म्हणून निवेदन सादर करता येणार नाही किंवा तसा बाहय दबाबव आणता येणार नाही.

(१०) आपले काम समाधानकारक नसल्यास अथवा आपल्या सेवेची आवश्यकता नसल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता आपल्याला सर्पमित्र तथा प्राणीमित्र पदाच्या जबाबदारीतून मुक्त करण्यात येईल.

(११)सदरच्या नेमणूका करण्याचे अथवा रदद करण्याचे सर्व अधिकार मा.आयुक्त यांना राहतील, याची नोंद घ्यावी.

तरी इच्छूक व अर्हताधारक उमेदवारांनी दिनांक०४/०८/२०१६ ते दिनांक ११/०८/२०१६ अखेरपर्यंत आपले अर्ज पशुवैदयकीय विभाग, कै.नारायण मेघाजी लोखंडे सभागृह, नेहरुनगर रोड, पिंपरी - १८ या पत्यावर आवश्यक कागदपत्रांसह समक्ष सादर करावे. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाची दखल घेतली जाणार नाही, याची स्पष्ट नोंद घ्यावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११०१८

जाहिरात क्र.४/२०१६
क्रमांक : पवै/१/कावि/ /२०१६.
दिनांक :३०/०७/२०१६